# जे का रंजले गांजले...त्यासी म्हणे जो आपुला
# देव तेथेची जाणावा...तोची साधू ओळखावा

आयुष्यभर कुटुंबातील सदस्यांसाठी स्वत:चे अस्तित्व विसरून काबाडकष्ट केले. तहान-भूक विसरून लेकरांना दोन घास वेळेवर मिळावे यासाठी अनेकदा उपासमार सहन करून जगलेल्या अशा कुटूंबप्रमुखांना स्वत:च्या वृध्दाअवस्थेत मात्र आडगळीत टाकले जात आहे. तसेच अनेक वृध्द आधार नसल्यामुळे निराधारणाचे जीवन जगत आहेत. कोणी खूप अगोदरच विधवा झाल्या तर कोणाची मुले अवेळी जग सोडून गेली. अशा अनेक वृध्दांवर या जीवनाच्या शेवटच्या टप्प्यावर मात्र उपासमारीची वेळ आलेली आहे. ही नियतीची क्रुर चेष्टाच म्हणावी लागेल. अशा वृध्दांना धड एक वेळेचे जेवण पण मिळणे कठीण झाले आहे. ही बाब आम्हा रोटरी सदस्यांना वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबविताना निदर्शनास आली, म्हणून सामाजिक बांधीलकी जपत रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनने रोटरी अन्नपूर्णा योजनेची सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज शंभर वृध्द व निराधार व्यक्तींना स्वच्छ, ताजे व सात्वीक असा जेवणाचा डब्बा घरपोच दिला जातो.

## १. लाभार्थ्यांची निवड

सर्व रोटरी सदस्यांनी तसेच काही सामाजिक संस्था व सामजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या मदतीने शहारातील वेगवेगळ्या भागांचा सर्व्हे करून गरजू लोकांच्या माहितीचे फॉर्म एकत्र केले गेले. तसेच विविध सोशल मिडिया माध्यमांद्वारे आव्हान करण्यात आले, व आलेल्या सर्व लाभार्थ्यांच्या अर्जाची छाननी प्रत्येकाच्या घरी भेट देवून सर्व प्रकारची शहानीशा करून क्लबनी ठरवलेल्या निकषाच्या आधारे निवड करण्यात येते.



## २. भोजन बनविणे व वितरण

लातूर शहारात अनेक खानावळी आहेत, पण महिलांच्या सक्षमीकरणाची गरज ओळखून या योजनेसाठी लागणारा दररोजचा जेवणाचा डब्बा तयार करून देण्याचे काम सध्या गुणवंतीबेन ठक्कर माहिला सशक्तीकरण केंद्र येथे करून घेण्यात येत आहे. विशेष म्हणजे दररोजच्या जेवणाची गुणवत्ता चाचणी केली जाते. दररोज स्वयंपाक तयार झाल्यावर रोटरी क्लबच्या सदस्यांकडून चव तपासली जाते व वितरणाच्या वेळेस डब्ब्याची परत एकदा तपासणी केली जाते. हे सर्व डब्बे दररोज अगदी वेळेवर ठराविक ठिकाणी पोहचविण्याचे कार्य ऑटोरिक्षा व्दारे करण्यात येते. मोठ्या सर्व सणांच्या दिवशी डब्यामध्ये मिष्ठान्न भोजन दिले जाते.



## ३. आर्थिक मदत

अशा या मानवतावादी उपक्रमासाठी मदतीचे अनेक हात पुढे येत आहेत. लातूर भांडी असोसिएशन व्दारे या योजनेसाठी सर्व रिकामे डब्बे मोफत देण्यात आले आहेत. शहरातील बऱ्याच दानशूर व्यक्ती स्वत:हून या योजनेसाठी मदत करण्याची तयारी दर्शवित आहेत. आमचे सर्व रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे सर्व सभासद तन-मन-धन देवून या कार्यात स्वत:ला झोकून देत आहेत, तरीही या योजनेच्या अखंडीत प्रवासासाठी मदतीच्या अनेक हातांची गरज लागणार आहे. अशा या अन्नपूर्णा योजनेला तुम्ही आर्थिक मदत करू शकता व या निराधारांना अन्नपूर्णा योजनेव्दारे आधार देवू शकता.



## ४. इतर उपक्रम

अन्नपूर्णा योजनेतील सर्व वृद्धांची आरोग्य तपासणी करून आवश्यक अशा उपचारासाठी मदत करण्यात येत आहे, सर्व वृद्धांना आवश्यक अशा कपड्यांची मदत करण्यात येत आहे. जसे रजाई, स्वेटर, ड्रेस, साड्या, तसेच त्यांना जेवणासाठीचे भांडे व इतर गरजांच्या वस्तुंची पण वेळोवेळी मदत करण्यात आलेली आहे.

तर चला निराधारांना अन्नपूर्णाचा आधार देवूयात तसेच अन्नपूर्णाला आर्थिक आधार देवून माणसातील माणुसकी जागवूया.



एक व्यक्ती वार्षिक पालकत्व रक्कम फक्त रू.१०,०००/-

रोटरी अन्नपूर्णा आश्रयदाते योजना ६५,०००/-

: संपर्कचा पत्ता :

**रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन,**
C/o शशीकांत मोरलावार, पंदीलवार ट्रेडर्स,
शिवनेरी गेट जवळ, मार्केट यार्ड, लातूर
**Mo.: 9890943539, 9822308963, 8788624276**

बँक खात्याचा तपशील :

**रोटरी अन्नपूर्णा योजना, लातूर**
बँक : जनता सहकारी बँक लि.पुणे
खाते क्रमांक : 013220100048209
IFSC Code : JSBP0000013
शाखा – चैनसुख रोड, लातूर

Club No.-22604
Trust Reg.No.E294/Latur
Rotary International District-3132

Rotary

रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाउन
संचलित
रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन चॅरिटेबल ट्रस्ट

# रोटरी अन्नपूर्णा योजना

निराधार वृद्ध व्यक्तींना दररोज घरपोच, ताजे, स्वच्छ व सात्विक जेवण देणारी योजना

